# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

**प्रेसनोट** दिनांक:- २३/०२/२०१७

## मोटर सायकल चोरीचे मोठे रॅकेट उघडकीस

### स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने हप्ताभरात केल्या एकुण ५० मोटर सायकल हस्तगत

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.**, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो**, व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड** सो यांनी जिल्हयातील वाढत्या मोटर सायकल चोरीचे गुन्हयांचा आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन व सुचना दिल्या होत्या. तसेच मोटर सायकल चोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध होणेसाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास व पोलीस ठाण्यांकडील गुन्हे शोध पथकांना सतर्क गस्त घालणेबाबत आदेश दिले होते. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांचे पथकाने गेल्या आठवडयात सिन्नर तसेच सुरगाणा तालुक्यातील ०५ मोटर सायकल चोरांना ताब्यात घेवुन एकुण ३० मोटर सायकल हस्तगत केल्या होत्या. सदर गुन्हयातील आरोपीतांचे इतर साथीदारांचा स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कसोशिने शोध घेत होते.

दरम्यान दिनांक २२/०२/२०१७ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी मालेगाव, सटाणा तसेच कळवण तालुक्यात मोटर सायकल चोरीचे गुन्हयांचा समांतर तपास करत असतांना **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांना गुप्त बातीमदारांमार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की, मालेगाव येथील काही गुन्हेगार चोरीच्या मोटर सायकल विक्रीसाठी देवळा येथे घेवुन येत असलेबाबत समजले. त्याप्रमाणे स्थागुशाचे पथकाने मालेगाव येथील फुलेपुतळा परिसरात सापळा रचुन संशयीत इसम नामे **१) मुशरीफखान आरिफखान,** वय २३, रा. म्हाळदे शिवार, मैला डेपो मालेगाव, **२) जहिर अहमद अब्दुल माजिद**, वय ३३, रा. कारवा चौक, आझादनगर मालेगाव यांना शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपीतांचे कब्जात एक बजाज डिस्कव्हर मोटर सायकल मिळुन आली, सदर मोटर सायकलचे चेसिस व इंजिन नंबरवरून मुळ मालकाबाबत माहिती घेतली असता, सदरची मोटर सायकल ही देवळा पोलीस ठाणे I गुन्हा रजि.नं. ५१/२०१७ भादवि कलम ३७९ या गुन्हयातील असल्याचे समजले. सदर आरोपीतांना वरील गुन्हयाचे समांतर तपासात अधिक चौकशी केल असता त्यांनी त्यांचा साथीदार नामे **३) तौसिफ उर्फ नाटया** (पुर्ण नाव माहि नाही), रा.आझादनगर मालेगाव याचेसह मालेगाव, देवळा, साक्री-धुळे, नाशिक शहर, दिंडोरी अशा विविध ठिकाणांवरून मोटर सायकली चोरी केल्याची कबुली दिली आहे. आरोपी नामे तौसिफ उर्फ नाटया याचा स्थागुशाचे पथक शोध घेत असुन ताब्यात घेतलेले वरील आरोपीतांचे कब्जातुन **०३ बजाज डिस्कव्हर, ०२ बजाज प्लॅटीना, ०५ हिरो स्प्लेंडर, ०१ यामाहा एफ.झेड.** अशा एकुण **११ मोटर सायकल** कि. ०३ लाख ६० हजार रू. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर मोटरसायकलच्या नंबर प्लेट बनावट असुन मुळ मालकांचा शोध सुरू आहे. सदर आरोपी हे सराईत असुन मोटर सायकल चोरीचे अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

त्याचप्रमाणे स्थागुशाचे दुसरे पथकाने मिळविलेल्या गुप्त माहितीचे आधारे सुरगाणा तालुक्यातील गुही गावात चोरीच्या मोटर सायकल कमी किंमतीचे दरात विक्री केल्या जातात, बाबत समजले वरून पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी गुही येथील **एका विधी संघर्षित बालकास** ताब्यात घेवुन त्याचे घराचे बाजुस बोळीमध्ये लावलेल्या मोटर सायकलीं बाबत विचारपुस करता त्याने व त्याचा फरार साथीदार नामे **२) गणेश शिवराम पवार उर्फ गण्या बाटा**, रा.अलंगुण मोखपाडा, ता.सुरगाणा याचेसह जिल्हयातील विविध ठिकाण तसेच गुजरात राज्यातुन चोरी केल्याची कबुली दिली आहे.

सदर बाबत कळवण पोलीस ठाणेस । गुन्हा रजि. १५/२०१८ प्रमाणे गुन्हा दाखल असुन वरील विधी संघर्षित बालक याचे कब्जातुन **०४ हिरो स्प्लेंडर, ०३ बजाज पल्सर, ०१ हिरो सुपर स्प्लेंडर, ०१ होंडा युनिकॉर्न** अशा एकुण **०९ मोटर सायकल किं. ३ लाख ९० हजार रूपयांचा मुद्देमाल** जप्त करण्यात आलेला आहे. जप्त करण्यात आलेल्या एकुण २० मोटर सायकल व ताब्यात घेतलेले आरोपींना पुढील तपासकामी **कळवण व देवळा** पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले असुन मोटर सायकल चोरीचे मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता आहे.

**<u>नागरीकांना आवाहन :-</u>**

जप्त करण्यात आलेल्या एकुण २० मोटर सायकलींचे नंबर गुन्हेगारांनी बदलेले असुन ते बनावट आहे. जप्त करण्यात आलेल्या काही मोटर सायकलचे मुळ मालकांचा शोध लागलेला नाही. ज्या नागरीकांच्या मोटर सायकल चोरीस गेल्या असेल त्यांनी चेसिज नंबर व इंजिन नंबर वरून खात्री करून स्थानिक गुन्हे शाखा कार्यालय फोन नंबर ०२५३-२३०९७१०, तसेच **कळवण पोलीस ठाणे दुरध्वनी क्र. ०२५९२-२२१०३३, तसेच देवळा पोलीस स्टेशन दुरध्वनी क्र. ०२५९२-२२८२३३** या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**., अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो**, अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, सहा.पोलीस निरीक्षक राम करपे, पोलीस उपनिरीक्षक श्री. मच्छिंद्र रणमाळे, सपोउनि रामभाउ मुंढे, रवि शिलावट, पोहवा हनुमंत महाले, दिपक आहिरे, जे.के.सुर्यवंशी, नामदेव खैरणार, कृष्णा भसरे, अशोक जगताप, सुधाकर खरोले, सुनिल पानसरे, पोना वसंत खांडवी, पुंडलीक राउत, अमोल घुगे, पोकॉ राजु वायकंडे, गणेश पवार, प्रदिप बहिरम, हेमंत गिलबिले, संदिप लगड अशांचे पथकाने **गेल्या हप्ताभरात** आतापावेतो **जिल्हयातील विविध ठिकाणांवरून चोरीस गेलेल्या एकुण ५० मोटर सायकल हस्तगत** केलेल्या आहे. मोटर सायकल चोरीचे गुन्हयांना प्रतिबंध होणेसाठी आगामी काळात अशाच प्रकारे कारवाई सुरू राहणार आहे.